**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी,**

बां.प्र.क्र./३७/२०१५-२०१६
जा.क्र.नं.र.वि./902
दिनांक :- 17/8/2016

(ॲपेंडीक्स XIII )

नियम क्र.६(४)

## जोता तपासणी प्रमाणपत्र

प्रति,
श्रीम. राबियाबाई मोहम्मद उमर अन्सारी
व्दारा :- युरेका कन्सल्टंट,
१६७, ठाणा रोड, भिवंडी.

**विषय :- जोता तपासणी प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**मौजे- निजामपुर येथील स.नं.१३०,४९/१ पै, सि.स.नं.४३७१ पै,४३७२ पै.**

**संदर्भ :-१) या कार्यालयाची बांधकाम परवानगी क्र.न.र.वि./१८८२ दि.०४/११/२०१५.**
**२) आपले इंजिनिअर ह्यांची पायापर्यंतचे बांधकाम पूर्ण झाल्याबाबतची सूचना पत्र दि. ०२/०४/२०१६ रोजीचा अर्ज व दि. ०२/०४/२०१६ रोजीचे स्ट्रक्चरल प्रमाणपत्र.**

महोदय,

संदर्भिय क्र.१ अन्वये आपणांस **मौजे- निजामपुर येथील स.नं.१३०,४९/१ पै, सि.स.नं.४३७१ पै,४३७२ पै.** मधील क्षेत्र **६६९.१२ चौ.मी.** क्षेत्रावर बांधकाम परवानगी देण्यांत आली आहे. त्यानुसार संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये आपण इमारतीचे जोत्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण केल्याचे कळविले आहे. त्या अनुषंगाने **दि.०७/०४/२०१६** रोजी जागेची प्रत्यक्ष स्थळपाहणी विभागाच्या कनिष्ठ अभियंता व उप अभियंता यांनी केली असता, आपण मंजूर नकाशामध्ये दर्शविल्या प्रमाणे इमारतीचे जोत्यापर्यंतचे बांधकाम अनुज्ञेय आवश्यक सामासिक अंतरामध्ये आहे. तसेच संदर्भ क्र.२ अन्वये सादर केलेले स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडील प्रमाणपत्र /नकाशे पाहता इमारतीचे जोत्यावरील बांधकाम मंजुर नकाशानुसार पुढे चालु ठेवण्यास बांधकाम परवानगीपत्रांतील अटी व शर्ती कायम ठेवून खालील अटींवर मजुरी देण्यांत येत आहे.

१) भूकंपाचा संभाव्य धोका विचारात घेऊन ईमारतीच्या सांगाडयाची संरचना भूकंप प्रतिबंधक ईमारतीसाठी आवश्यक असणाऱ्या आवश्यक संरचनेप्रमाणे परवानाधारक व अहर्ताधारक स्ट्रक्चरल इंजिनियर यांचेकडील प्राप्त संरचनेच्या नकाशाप्रमाणे पुढील बांधकाम करणेची दक्षता घेण्यांत यावी.

२) जोता तपासणी प्रमाणपत्रानंतर जोत्यामध्ये कोणत्याही स्वरुपाचे फेरफार केल्यास, देण्यात आलेले प्रमाणपत्र रदद करण्यांत येईल व असे बांधकाम अनधिकृत समजून काढुन टाकण्यांत येईल याची कृपया नोंद घ्यावी.

आवक क्र. 3C
दिनांक 24/8/16

Paya tapasani/91

३) सांडपाणी,मैला निर्मुलनासाठी मनपाचे गटार नसल्यास त्याची व्यवस्था करण्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदारांची राहील.

४) मनपाच्या पाणी पुरवठ्याची क्षमता व शहराची वाढती लोकसंख्या विचारांत घेता,बांधकामाला पाणीपुरवठा करणे मनपास शक्य नसल्यास अर्जदाराने विषयाधीन विंधन विहीर / कुपनलिकेतील पाणी हे प्रस्तावित बांधकामासाठी वापरणे अर्जदार/विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

५) विकासकर्त्याने/ जमिनधारकाने बांधकाम वापर दाखल्यापूर्वी पायाभूत सुविधा कुंपणभितीसह विकसित करणे बंधनकारक राहील.

६) करण्यांत आलेल्या बांधकामात फ्लाय ॲश विटा व त्या आधारीत साहित्य वापर केला असल्याचे संबंधित आर्किटेक्ट/इंजिनिअर यांचेकडील प्रमाणपत्र वापर परवान्यापूर्वी सादर करावे लागेल.

७) भविष्यात इलेक्ट्रीक पोल / ट्रान्सफार्मर करीता जागेची आवश्यकता मनपा अथवा विद्युत मंडळास भासल्यास सामासिक अंतरामधुन अशी जागा उपलब्ध करुन द्यावी लागेल.

८) शासन निर्णय दि.१५/१/२०१६ नुसार प्रकल्पामध्ये सांडपाणी प्रक्रीया व पुनर्वापर करणेबाबतची व्यवस्था करणे आपणांवर बंधनकारक राहील.

आपला,

(प्र.शा.रविराव)
**नगररचनाकार,**
**भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिका,**
**भिवंडी.**

**प्रत :-** १) प्रभाग अधिकारी, प्रभाग क्र.५ यांना माहितीसाठी रवाना.
२) स्थानिक विभाग, भिनिशमनपा, भिवंडी